# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड        जा.क्र. ३१४/२०१९        दिनांक  १२/०९/२०१८**

## १) दरोडयाची तयारी :-

**नांदेड ग्रामीण :-** दि. ११.०९.२०१९ रोजी ०१.३० ते ०२.०० वा. चे दरम्यान, असर्जन ते हस्सापुर जाणारे रोडवर नांदेड येथे, यातील नमुद आरोपीतांनी एकत्रीत येऊन सोबत गैरकायदेशिपणे अग्नीशस्त्रे, देशी बनावटीचे पिस्टल व जिवंत काडतुस घातक व धारधार खंजीर हे शस्त्रे दरोडयासारखा गुन्हा करण्यासाठी लागणारे साहित्य लांब दोरी, व मोटार सायकल ताब्यात बाळगुन दरोडयासाखा किंवा त्यासारखा गंभीर गुन्हा करण्याचे उद्देशाने मिळुन आले. त्यांना पकडताना बळाचा वापर करुन तसेच स्वरक्षणार्थ त्यांचे दिशने पिस्टलने दोन राऊंड फायर करुन पकडण्यात आले आहे. वगैरे **फिर्यादी सपोनि/सुनिल चंद्रकांतराव नाईक, ने. स्थागुशा** यांनी दिलेल्या फिर्यादीवरून **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं ४४५/२०१९ ,कलम ३९९, ४०२, ५०६, भादवी सह कलम ३/२५ भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास / शेख जावेद शब्बीर, मो.क्र. ९५२७४४८८११** हे करीत आहेत.

## २) खुनाचा प्रयत्न :-

**विमानतळ :-** दिनांक १०.०९.२०१९ रोजी १८.०० वा.चे सुमारास, ग्यानमाता शाळेजवळ, नांदेड ते अर्धापुर जाणाऱ्या रोडवर असलेल्या गणेश ठाकुर यांचे पानपटीवर नांदेड येथे, यातील फिर्यादी हा नमुद ठिकाणी उभा असतांना तेथे यातील नमुद आरोपी आला असता त्यास फिर्यादीने विचारल की, तुम्ही माझ्या मेव्हण्यासोबत भांडण का केले म्हणुन विचारले असता आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करुन त्याचे हातातील तलवारीने जिवे मारण्याचे उद्देशाने डावे खांदयावर, उजव्या हातावर, मानेवर, वार केला असता सदर तलवारीचा वार हुकवित असतांना त्यापैकी एक वार फिर्यादीचे डाव्या छातीला शर्टला तलवारीचे टोक लागुन शर्ट फाटले, तेव्हा फिर्यादीने आरडा ओरड केली असता साक्षीदार यांनी सोडवा सोडव केली. जुन्या वादावरुन आरोपीने फिर्यादीस जिवे मारण्याचा प्रयत्न केला. वगैर **फिर्यादी शशिकांत पि. सखाराम भडकळ, वय १९ वर्षे, व्यवसाय मजुरी रा. गुरुनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं. २१६/२०१९ कलम ३०७, ५०४, भादवि सह कलम ४/२५ भा.ह. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास मपोउपनि/सपकोळे , मो.क्र. ९५२७५९४१००** हे करीत आहेत.

## ३) जनावर चोरी :-

**हिमायतनगर :-** दिनांक ०९.०९.२०१९ रोजी चे २३.०० ते दि. १०.०९.२०१९ चे ०४.३० वा. चे दरम्यान, मौजे टेंभी शिवार ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे, यातील आज्ञात आरोपीने एक मुर्गा, दोन म्हशी किंमती १,६५,०००/-रु चे फिर्यादीच्या आखाडयावरुन चोरुन नेल्या. वगैरे **फिर्यादी बालाजी विश्वनाथ कदम, वय ४० वर्षे, व्यवसाय शेती रा. टेंभी ता. हिमायतनगर जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं १६१/२०१९ कलम ३७९, ३४, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१९६९ चोले, मो.नं. ९७६५८८७१५०** हे करीत आहेत.

## ४)अवैध रेती चोरी :-

**देगलुर :-** दिनांक ३०.०४.२०१९ ते दि. ०४.०६.२०१९ चे दरम्यान, तमलुर रेती घाट ता. देगलुर जि. नांदेड येथे, यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन बिना परवाना बेकायदेशिर रीत्या शासनाने नेमुन दिलेल्या क्षेत्राव्यतीरीक्त इतरत्र १२५४ ब्रास रेती किंमती ५२,३५,४५०/-रु ची रेतीची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने अवैध साठा करुन ठेवलेली मिळुन आली. वगैरे **फिर्यादी सुरेश संभाजीराव मैड, वय ४० वर्षे, व्यवसाय तलाठी रा. तहसिल कार्यालय देगलुर** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं ३३९/२०१९ कलम ३७९, ३४, भादवी सह कलम १५ पर्यावारण संरक्षण अधिनियम १९८६ कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/ सांगळे मॅडम, मो.क्रं. ८६६८४५५७३०** हे करीत आहेत.

## ५) मो.सा.चोरी :-

**विमानतळ :-** दिनांक २३.०७.२०१९ रोजी चे रात्री १२.०० ते दिनांक २७.०७.२०१९ वा चे ०५.०० वा. चे दरम्यान, पिरबुऱ्हाणनगर गल्ली नं.-१५ नांदेड येथे, यातील फिर्यादीने त्याची बजाज पल्सर २२० कंपणीची मो.सा. क्रमांक एम.एच.-२६/बी.एल-१५२७ किंमती ५०,०००/-रु ची कोणीतरी आज्ञात चोरटयांने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी चंद्रकांत सगरोळे, वय १९ वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. सेळगांव ता. देगलुर ह.मु. सहयोगनगर राजकॉर्नर नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं २१८/२०१९ कलम ३७९ भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१२२६ वाघमारे, मो.क्रं. ८८८८०७६९३५** हे करीत आहेत.

## ६) अपहार :-

**वजिराबाद :-** दिनांक १७.०६.२०१९ ते दि. १०.०९.२०१९ चे दरम्यान वेळोवेळी, मनपा कार्यालय नांदेड येथे, यातील नमुद आरोपीने म.न.पा. हद्दीत वसुल केलेली पाणीपट्टी रक्कम १,८०,१०२/-रु हे मनपा कार्यालयात जमा न करता शासकीय रकमेचा अपहार केला. वगैरे **फिर्यादी जावेद अहेमद गुलाम एसदानी, वय ५० वर्षे, व्यवसाय नौकरी कार्यालय अधिक्षक पाणीपुरवठा विभाग मनपा कार्यालय नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरन.२८५/२०१९ कलम ४०९, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/पन्हाळकर, मो.क्र. ९८२१६९२२६१** हे करीत आहेत.

## ७)महाराष्ट्र नगर रचना अधिनियम :-

**विमानतळ :-** दिनांक २३.०७.२०१९ रोजी चे १२.०० वा. चे सुमारास, असदुल्लाबाद बँक कॉलनी नांदेड येथे, यातील नमुद आरोपीने मनपा नांदेड यांनी मंजुर केलेल्या नकाशा पेक्षा जास्तीचे बांधकाम केले. वगैरे **फिर्यादी गौतम विठ्ठलराव कवडे, वय ४९ वर्षे, व्यवसाय सहा आयुक्त क्षेत्रीय कार्यालय क्रं. -२ अशोकनगर नांदेड वाघाळा शहर मनपा नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं २१७/२०१९ कलम ५२ महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१६५५ कुरुळेकर, मो.क्रं. ९९२३६९६७०४** हे करीत आहेत.

## ८) रेल्वेच्या धडकेने महिलेचा मृत्यु :-

**धर्माबाद :-** दिनांक ११.०९.२०१९ रोजी चे १६.०० ते १७.०० वा. चे दरम्यान, समराळा शिवार ता. धर्माबाद जि. नांदेड येथे, यातील **मयत नामे लक्ष्मी पि. पोतन्ना कर्लपोड, वय ५० वर्षे, रा. समराळा ता. धर्माबाद** हि शेताकडुन घराकडे येत असतांना रेल्वेच्या धडकेने मरण पावली आहे. वगैरे **खबर देणार दत्ता लक्ष्मण कोकुलवार, वय ३० वर्षे, रा. समराळा ता. धर्माबाद** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे धर्माबाद** आ.मृ. २४/२०१९ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ.मृ. दाखल असुन **तपास पोहेकॉ/१६८८ आडे, मो.क्र. ९९२३६९२५८८** हे करीत आहेत.

## ९) विद्युत शॉक लागुन मृत्यु :-

**हदगाव :-** दिनांक १०.०९.२०१९ रोजी चे १७.०० वा. चे सुमारास, मौ. पिंपरखेड मयताचे घरासमोर ता. हदगाव जि. नांदेड येथे, यातील **मयत नामे परमेश्वर तुकाराम नेवरकर, वय २७ वर्षे, रा. पिंपरखेड ता. हदगाव** हा लोखंडी विद्युत पोलला हात लावुन ऊभा टाकला असता पोल मध्ये विद्युत प्रवाहा उतरुन मयतास शॉक लागला असता त्यास उपचार कामी स. द. हदगाव येथे शरीक केले असता डॉ. ने मृत घोषीत केले. वगैरे **खबर देणार पोहेकॉ/१५६९ डी.एस. कदम, ने. पोस्टे हदगाव** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे हदगाव** आ.मृ. २७/२०१९ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ.मृ. दाखल असुन **तपास पोना/२१८५ वडजे, मो.क्र. ७३५०१०८१५०** हे करीत आहेत.

## १०) प्रोव्हिबीशन :-

**अ)रामतिर्थ :-** दिनांक ११.०९.२०१९ रोजी चे १९.४५ वा. चे सुमारास, मौ.जुनेगाव नरर्सी ता. नायगाव जि. नांदेड येथे, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारु भिंगरी संत्राचे १८० एम.एल.चे ९६ बॉटल किंमती ४,९९२/- रु चा माल अवैध रित्या चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने टिव्हीएस मो.सा. क्रमांक एम.एच.-२६/ए.एच.-४३६८ किंमती २०,०००/-रु ची असा एकुण २४,९९२/-रु चा माल वाहातुक करीत असतांना ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोनि/सोमनाथ वसंतराव शिंदे , ने. पोस्टे रामतिर्थ** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे रामतिर्थ** गुरन १२९/२०१९ कलम ६५(ई), महाराष्ट्र प्रो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/२४७६ पठाण, मो.क्र. ९५२७०९९२९९** हे करीत आहेत.

**ब)सोनखेड :-** दिनांक ११.०९.२०१९ रोजी चे १५.०० ते १५.२० वा. चे सुमारास, सोनखेड ते नांदेड जाणारे रोडवर बसस्थानका जवळ ता. लोहा जि. नांदेड येथे, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारु भिंगरी संत्राचे १८० एम.एल.चे १७ बॉटल किंमती ८५०/- रु चा माल अवैध रित्या चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने स्वतःच्या ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/सोमनाथ विठ्ठलराव बोरगावे , ने. पोस्टे सोनखेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे सोनखेड** गुरन ९१/२०१९ कलम ६५(ई), महाराष्ट्र प्रो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/एस. बी. आडे, मो.क्र. ८३९०७००८२१** हे करीत आहेत.

**क)बिलोली :-** दिनांक ११.०९.२०१९ रोजी चे १२.३५ वा. चे सुमारास, मौ. बडुर संगमेश्वर शाळेसमोर टिन शेडचे पत्रामध्ये ता. बिलोली जि. नांदेड येथे, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारु भिंगरी संत्राचे १८० एम.एल.चे २७ बॉटल किंमती ८८४/- रु चा माल अवैध रित्या चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने स्वतःच्या ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/२३४४ गोविंद दत्तात्रय लुंगारे , ने. पोस्टे बिलोली** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे बिलोली** गुरन २२०/२०१९ कलम ६५(ई), महाराष्ट्र प्रो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१९८५ शिंदे, मो.क्र. ९९२२६५२४६१** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४